**अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स यासंदर्भात करावयाच्या कारवाईबाबत. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयाची अंमलबजावणी.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. याचिका-३०१७/प्र.क्र. १३०/नवि-२२**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १४ मार्च, २०१७

**वाचा :-** १) जनहित याचिका क्र.१५५/२०११ मधील दि.३१.१.२०१७ चे मा.उच्च न्यायालयाचे आदेश.
२) शासन परिपत्रक क्र.याचिका-३०१७/प्र.क्र.१३०/नवि-२२, दि.१८.२.२०१७

**प्रस्तावना :-**

अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स, बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. १५५/२०११, मे. सुस्वराज्य फाऊंडेशन, सातारा आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर या याचिकेवरील सुनावणीमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३१.१.२०१७ रोजी विस्तृत निकाल दिलेला आहे. मा.उच्च न्यायालयाचे सदरचे आदेश संदर्भ क्र.२ मधील परिपत्रकान्वये सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना कळविण्यात आलेले आहेत.

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त आदेशामध्ये अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स यावर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अनधिकृत जाहिरातींवर प्रतिबंध होण्याच्या दृष्टीकोनातून सदर याचिकेवर निर्णय देतांना सविस्तर निर्देश (Directions) दिलेले आहेत.

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सदरच्या निर्देशांनुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही करण्याची जबाबदारी सर्व महानगरपालिका, अन्य नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हाधिकारी व पोलिस विभागाची राहणार आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर केलेला कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठ स्तरावर समिती नियुक्त करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरून समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स यासंदर्भात करावयाच्या कारवाईबाबत जनहित याचिका क्र.१५५/२०११ या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास अनुसरून खालील समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. अप्पर मुख्य सचिव (गृह विभाग) | - | अध्यक्ष |
| २. प्रधान सचिव (नवि-२) (नगर विकास विभाग) | - | सदस्य |
| ३. प्रधान सचिव (महसूल विभाग) | - | सदस्य |
| ४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय | - | सदस्य सचिव |

२. सर्व महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य अधिकारी तसेच जिल्हा पोलिस अधिक्षक आणि पोलिस आयुक्त यांनी नियुक्त केलेले नोडल ऑफिसर्स, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केलेल्या अंमलबजावणीचा मासिक अहवाल उपरोक्त समितीस सादर करावा.

३. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडून मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात नमूद केलेल्या कालावधीत अहवाल प्राप्त करून घेऊन सदरचा अहवाल दि.१९.४.२०१७ पूर्वी समितीला सादर करावा. त्यानंतर उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबतचा कार्यपूर्ती त्रैमासिक अहवाल परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केलेल्या समितीस सादर करण्याची कार्यवाही करावी. परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडून आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी प्राप्त करून घेतलेला अहवाल नगर विकास विभागमार्फत संबंधीत कार्यासनाने (कार्यासन क्र.नवि-२९) शासकीय संगणक संकेतस्थळावर तात्काळ प्रसारित करावा व सदर अहवालाची प्रत जनहित याचिकेतील पक्षकारांच्या वकीलांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशातील परिच्छेद क्र.५९ (CC) मध्ये नमूद केल्यानुसार देण्यात यावी.

४. महसूल व वन विभाग तसेच गृह विभागाने त्यांच्या अखत्यारीतील संबंधीत अधिकाऱ्यांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी तातडीने करणेबाबत सूचना द्याव्यात.

५. जनहित याचिका क्र.१५५/२०११ याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या दि.३१.१.२०१७ च्या विस्तृत आदेशातील आदेश क्र.५९ (CC) मध्ये नमूद केलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७०३१४१५२२०१६३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Sharadchandra Gokhale

Digitally signed by Sanjay Sharadchandra Gokhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DEPUTY SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay Sharadchandra Gokhale
Date: 2017.03.14 18:46:05 +05'30'

**( सं.श. गोखले )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,

यांना कळविण्यात येते की, सदर शासन निर्णय आपल्या अधिपत्याखालील सर्व नागरी स्थनिक स्वराज्य संस्थांच्या निदर्शनास आणावे व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे विहित कालावधीत पालन करण्याबाबत तातडीने सूचना दयाव्यात. तसेच या शासन निर्णयातील निर्देशास अनुसरून तातडीने कार्यवाही करावी.

**प्रत,**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई § ३२.
२. मा.प्रधान सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
५. आयुक्त, सर्व महानगरपालिका.
६. पोलिस आयुक्त, सर्व.
७. जिल्हाधिकारी, सर्व
८. कार्यासन अधिकारी, (नवि-११,१८,१९,२१,२३,२४,२५,२६ व २८) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. निवड नस्ती (नवि-२२).